"गोड मुलांनो - बाबा आले आहेत तुम्हा मुलांना दुःखधामचा संन्यास देण्यासाठी, हाच बेहदचा संन्यास आहे"

प्रश्नः- त्या संन्याशांच्या संन्यासामध्ये आणि तुमच्या संन्यासामध्ये कोणता मुख्य फरक आहे?

उत्तरः- ते संन्यासी घरदार सोडून जंगलामध्ये जातात परंतु तुम्ही घरदार सोडून जंगलात जात नाही. घरात राहून साऱ्या दुनियेला काट्यांचे जंगल समजता. तुम्ही बुद्धीने साऱ्या दुनियेचा संन्यास करता.

ओम् शांती. रूहानी बाबा बसून रूहानी मुलांना दररोज समजावून सांगतात कारण अर्ध्या कल्पाचे अज्ञानी आहेत ना. त्यामुळे रोज-रोज समजावून सांगावे लागते. सर्वात आधी तर मनुष्यांना शांती पाहिजे. सर्व आत्मे खरे तर रहिवासी देखील शांतीधामचे आहेत. बाबा तर आहेतच सदैव शांतीचे सागर. आता तुम्ही शांतीचा वारसा प्राप्त करत आहात. म्हणतात ना - 'शान्ति देवा...'. अर्थात् आम्हाला या सृष्टीमधून आपल्या घरी शांतीधामला घेऊन जा अथवा शांतीचा वारसा द्या. देवतांसमोर किंवा शिवबाबांसमोर जाऊन म्हणतात की, शांती द्या; कारण शिवबाबा आहेत शांतीचा सागर. आता तुम्ही शिवबाबांकडून शांतीचा वारसा घेत आहात. बाबांची आठवण करता-करता तुम्हाला शांतीधामला जरूर जायचे आहे. आठवण नाही जरी केलीत तरी देखील जाणार जरूर. आठवण अशासाठी करता की डोक्यावर जे पापांचे ओझे आहे ते नष्ट व्हावे. शांती आणि सुख मिळते एका बाबांकडूनच कारण ते सुख आणि शांतीचा सागर आहेत. हीच मुख्य गोष्ट आहे. शांतीला मुक्ती देखील म्हटले जाते आणि मग जीवनमुक्ती आणि जीवनबंध सुद्धा आहे. आता तुम्ही जीवनबंध पासून जीवनमुक्त होत आहात. सतयुगामध्ये कोणतेही बंधन नसते. गायले देखील जाते सहज जीवनमुक्ती किंवा सहज गती-सद्गती. आता दोन्हीचा अर्थ तुम्हा मुलांना समजला आहे. गती म्हटले जाते - शांतिधामला, सद्गती म्हटले जाते - सुखधामला. सुखधाम, शांतीधाम आणि हे आहे दुःखधाम. तुम्ही इथे बसला आहात, बाबा म्हणतात - 'मुलांनो, शांतीधाम घराची आठवण करा'. आत्मे आपले घर विसरले आहेत. बाबा येऊन आठवण करून देतात. समजावून सांगत आहेत - 'माझ्या रूहानी मुलांनो, जोपर्यंत माझी आठवण करत नाही तोपर्यंत तुम्ही घरी जाऊ शकत नाही. आठवणीने तुमची पापे भस्म होतील'. आत्मा पवित्र बनून मग आपल्या घरी जाईल. तुम्ही मुले जाणता ही अपवित्र दुनिया आहे. एकही मनुष्य पवित्र नाही. पवित्र दुनियेला सतयुग, अपवित्र दुनियेला कलियुग म्हटले जाते. राम राज्य आणि रावण राज्य. रावणराज्यामुळे अपवित्र दुनिया स्थापन होते. हा पूर्वनियोजित खेळ आहे ना. हे बेहदचे बाबा समजावून सांगतात, त्यांनाच सत्य म्हटले जाते. सत्य गोष्टी तुम्ही संगमावरच ऐकता नंतर मग सतयुगामध्ये जाता. द्वापर पासून मग रावण राज्य सुरू होते. रावण अर्थात असुर आहेत, असुर कधी सत्य बोलू शकत नाहीत म्हणून याला म्हटले जाते - 'झूठी माया, झूठी काया'. आत्मा देखील खोटी आहे तर शरीर देखील खोटे आहे. संस्कार आत्म्यामध्ये भरतात ना. ४ धातू आहेत ना - सोने-चांदी-तांबे-लोखंड... सर्व अशुद्धता निघून जाते. बाकी खरे सोने तुम्ही बनता या योगबलाद्वारे. तुम्ही जेव्हा सतयुगामध्ये असता तेव्हा खरे सोनेच असता. मग चांदी पडते तेव्हा चंद्रवंशी म्हटले जाते. नंतर मग तांब्याची, लोखंडाची अशुद्धता पडते द्वापर-कलियुगामध्ये. मग योगाद्वारे तुमच्यामध्ये जी चांदी, तांबे, लोखंडाची अशुद्धता पडली आहे ती निघून जाते. अगोदर तर तुम्ही सर्व आत्मे शांतीधाममध्ये असता मग सर्वप्रथम येता सतयुगामध्ये, तर त्याला म्हटले जाते गोल्डन-एजड (सुवर्ण युग). तुम्ही खरे सोने आहात. योगबलाने सर्व अशुद्धता निघून शेवटी खरे सोने उरते. शांतीधामला गोल्डन-एज म्हटले जात नाही. गोल्डन-एज, सिल्व्हर-एज, कॉपर-एज इथे म्हटले जाते. शांतीधाममध्ये तर शांती आहे. आत्मा जेव्हा शरीर धारण करते तेव्हा गोल्डन-एजड म्हटले जाते मग सृष्टीच गोल्डन-एज बनते. ५ सतोप्रधान तत्त्वांनी शरीर बनते. आत्मा सतोप्रधान असते त्यामुळे शरीर देखील सतोप्रधान असते. आणि शेवटी आइरन-एजड शरीर मिळते कारण आत्म्यामध्ये अशुद्धता पडते. तर गोल्डन-एज, सिल्व्हर-एज या सृष्टीला म्हटले जाते.

तर आता मुलांना काय करायचे आहे? सर्वात आधी शांतीधामला जायचे आहे यासाठी बाबांची आठवण करायची आहे तेव्हाच तमोप्रधानापासून सतोप्रधान बनाल. याला तितकाच वेळ लागतो, जितका वेळ बाबा इथे राहतात. ते

गोल्डन एजमध्ये पार्ट घेतच नाहीत. तर आत्म्याला जेव्हा शरीर मिळते तेव्हा म्हटले जाते हा गोल्डन-एज्ड जीव-आत्मा आहे. असे म्हणणार नाहीत की गोल्डन-एजड आत्मा. नाही, गोल्डन-एजड जीवात्मा मग सिल्व्हर-एजड जीवात्मा बनते. तर इथे तुम्ही बसले आहात, तुम्हाला शांती देखील आहे तर सुख देखील प्राप्त होते. तर काय केले पाहिजे? दुःखधामचा संन्यास. याला म्हटले जाते बेहदचा संन्यास. त्या संन्याशांचा आहे हदचा संन्यास, घर-दार सोडून जंगलामध्ये जातात. त्यांना हे माहीत नाही आहे की सारी सृष्टीच जंगल आहे. हे काट्यांचे जंगल आहे. ही आहे काट्यांची दुनिया, ती आहे फुलांची दुनिया. ते भले संन्यास घेतात परंतु तरी देखील काट्यांच्या दुनियेमध्ये, जंगलामध्ये शहरापासून दूर-दूर जाऊन राहतात. त्यांचा आहे निवृत्ती मार्ग, तुमचा आहे प्रवृत्ती मार्ग. तुम्ही पवित्र जोडपे होता, आता अपवित्र बनले आहात. त्याला गृहस्थ आश्रम देखील म्हणतात. संन्यासी तर नंतर येतात. इस्लामी, बौद्धी देखील नंतर येतात. ख्रिश्चनांच्या थोडे आधी येतात. तर या झाडाची सुद्धा आठवण करायची आहे, सृष्टीचक्राची सुद्धा आठवण करायची आहे. बाबा कल्प-कल्प येऊन कल्पवृक्षाचे ज्ञान देतात कारण स्वतः बीजरूप आहेत, सत् आहेत, चैतन्य आहेत म्हणून कल्प-कल्प येऊन कल्पवृक्षाचे रहस्य समजावून सांगतात. तुम्ही आत्मा आहात परंतु तुम्हाला ज्ञानसागर, सुखाचा सागर, शांतीचा सागर म्हटले जात नाही. ही महिमा एका बाबांचीच आहे जे तुम्हाला असे बनवतात. बाबांची ही महिमा सदैव आहे. ते सदैव पवित्र आणि निराकार आहेत. फक्त थोड्या काळासाठी पावन बनविण्याकरिता येतात. सर्वव्यापीची तर गोष्टच नाही. तुम्ही जाणता बाबा सदैव तिथेच (परमधाम मध्येच) राहतात. भक्तीमार्गामध्ये नेहमी त्यांची आठवण करतात. सतयुगामध्ये तर आठवण करण्याची गरजच नसते. रावण राज्यामध्ये तुमचे ओरडणे सुरू होते, तेच येऊन सुख-शांती देतात. तर मग नक्की अशांतीमध्ये त्यांची आठवण येते. बाबा समजावून सांगत आहेत - 'दर ५ हजार वर्षांनंतर मी येतो'. अर्धा कल्प आहे - सुख, अर्धा कल्प आहे - दुःख. अर्ध्या कल्पानंतरच रावणराज्य सुरू होते. यामध्ये मूळ एक नंबरचा आहे, 'देह-अभिमान'. त्याच्या नंतरच मग बाकीचे इतर विकार येतात. आता बाबा समजावून सांगत आहेत - 'स्वतःला आत्मा समजा, देही-अभिमानी बना'. आत्म्याची देखील ओळख पाहिजे. मनुष्य तर फक्त म्हणतात - 'आत्मा भृकुटीमध्ये चमकते'. आता तुम्ही समजता ती आहे अकालमूर्त, त्या अकालमूर्त आत्म्याचे तख्त (सिंहासन) हे शरीर आहे. आत्मा बसते देखील भृकुटीमध्ये. अकालमूर्तचे हे तख्त आहे, सर्व चैतन्य अकाल तख्त आहेत. ते अकालतख्त नाही जे अमृतसरला लाकडाचे बनवले आहे. बाबांनी समजावून सांगितले आहे की जे कोणी मनुष्यमात्र आहेत, सर्वांचे आपापले अकालतख्त आहे. आत्मा येऊन इथे विराजमान होते. सतयुग असो नाहीतर कलियुग असो, आत्म्याचे तख्त आहेच हे मनुष्य शरीर. तर किती अकालतख्त आहेत. जे काही मनुष्य आहेत ते अकाल आत्म्यांची तख्त आहेत. आत्मा एक तख्त सोडून लगेच दुसरे घेते. पहिले लहान तख्त असते नंतर मोठे होते. हे शरीररूपी तख्त लहान-मोठे असते, ते लाकडाचे तख्त ज्याला शीख लोक अकाल तख्त म्हणतात, ते काही लहान-मोठे होत नाही. हे कोणालाच माहित नाही आहे की सर्व मनुष्यमात्रांचे अकालतख्त ही भृकुटी आहे. आत्मा अकाल आहे, कधी विनाश होत नाही. आत्म्याला वेगवेगळी तख्त (शरीरे) मिळतात. सतयुगामध्ये तुम्हाला अतिशय फर्स्ट क्लास तख्त मिळते, त्याला म्हणणार गोल्डन-एजड तख्त. मग त्या आत्म्याला सिल्व्हर, कॉपर, आयरन एजड तख्त मिळते. पुन्हा गोल्डन-एजड तख्त हवे असेल तर नक्कीच पवित्र बनावे लागते; म्हणून बाबा म्हणतात - 'मामेकम् (मज एकाची) आठवण करा तर तुमच्यातील अशुद्धता निघून जाईल. मग तुम्हाला असे दैवी तख्त मिळेल'. आत्ता ब्राह्मण कुळाचे तख्त आहे. पुरुषोत्तम संगमयुगाचे तख्त आहे मग मज आत्म्याला हे देवताई तख्त मिळेल. या गोष्टी दुनियेतील लोक जाणत नाहीत. देह-अभिमानामध्ये आल्यानंतर एकमेकांना दुःख देत राहतात, म्हणून याला दुःखधाम म्हटले जाते. आता बाबा मुलांना समजावून सांगत आहेत - 'शांतीधामची आठवण करा, जे तुमचे खरे निवासस्थान आहे. सुखधामची आठवण करा, हे (दुःखधाम) विसरून जा, यापासून वैराग्य'. असे देखील नाही की संन्याशांप्रमाणे घरदार सोडायचे आहे. बाबा समजावून सांगत आहेत की, हे एका बाजूने चांगले आहे, दुसऱ्या बाजूने वाईट आहे. तुमचे तर चांगलेच आहे. त्यांचा हठयोग चांगला सुद्धा आहे, वाईट सुद्धा आहे कारण देवता जेव्हा वाममार्गामध्ये जातात तेव्हा भारताला थोपवून धरण्यासाठी पवित्रता अवश्य पाहिजे. तर त्यासाठी देखील मदत करतात. भारतच अविनाशी खंड आहे. बाबांचे येणे (अवतरण) देखील इथेच होते. तर जिथे बेहदचे बाबा येतात ते सर्वात मोठे तीर्थस्थान झाले ना. सर्वांची सद्गती बाबाच येऊन करतात, म्हणून भारतच सर्वश्रेष्ठ देश आहे.

मूळ गोष्ट बाबा समजावून सांगत आहेत - 'मुलांनो, आठवणीच्या यात्रेमध्ये रहा'. गीतेमध्ये देखील 'मनमनाभव' शब्द आहे परंतु बाबा काही संस्कृतमध्ये तर सांगत नाहीत. बाबा मनमनाभवचा अर्थ सांगतात - 'देहाचे सर्व संबंध

सोडून स्वतःला आत्मा निश्चय करा'. आत्मा अविनाशी आहे, ती कधी लहान-मोठी होत नाही. तिच्यामध्ये अनादि-अविनाशी पार्ट भरलेला आहे. ड्रामा पूर्वनियोजित आहे. नंतर शेवटी जे आत्मे येतात, त्यांचा पार्ट अतिशय थोडा आहे. बाकीचा सर्व वेळ शांतीधाम मध्ये राहतात. स्वर्गामध्ये तर येऊ शकत नाहीत. शेवटी येणारे तिथेच थोडेसे सुख उपभोगतात, तिथेच थोडेसे दुःख भोगतात. जसे दिवाळीला दिव्यावरचे किडे किती भरमसाठ येतात, सकाळी उठून बघितले तर सर्व किडे मरून पडलेले असतात. तर मनुष्यांचे देखील असेच आहे, शेवटी येणाऱ्याची किंमत ती काय असणार. अगदी पशूंसारखे झाले. तर बाबा समजावून सांगत आहेत - 'हे सृष्टीचक्र कसे फिरते, मनुष्यसृष्टीरूपी झाड लहानाचे मोठे कसे होते आणि मोठ्या पासून छोटे कसे होते'. सतयुगामध्ये किती थोडे मनुष्य, कलियुगामध्ये किती वाढ होत झाड मोठे होते. मुख्य गोष्ट बाबांनी इशारा दिला आहे - गृहस्थ व्यवहारामध्ये राहून मामेकम् (मज एकाची) आठवण करा. ८ तास आठवणीमध्ये राहण्याचा अभ्यास करा. आठवण करता-करता शेवटी पवित्र बनून बाबांकडे निघून जाल तर स्कॉलरशिप सुद्धा मिळेल. जर पापे राहिली तर पुन्हा जन्म घ्यावा लागेल. शिक्षा भोगतात आणि पदाचा दर्जा सुद्धा कमी होतो. हिशोब चुकता तर सर्वांनाच करायचा आहे. जे काही मनुष्य आहेत ते आत्तापर्यंतसुद्धा जन्म घेत राहतात. या वेळी बघितले तर भारतवासींपेक्षा देखील ख्रिश्चनांची संख्या जास्त आहे. आणि ते बुद्धीवान देखील आहेत. भारतवासी तर १०० टक्के बुद्धीवान होते, ते आता मंदबुद्धी बनले आहेत कारण हेच १०० टक्के सुख उपभोगतात आणि मग १०० टक्के दुःख सुद्धा हेच भोगतात. ते (ख्रिश्चन) तर येतातच शेवटी.

बाबांनी समजावून सांगितले आहे ख्रिश्चन घराण्याचा श्रीकृष्ण घराण्याशी संबंध आहे. ख्रिश्चनांनी राज्य हिसकावून घेतले मग ख्रिश्चन घराण्याकडूनच राज्य मिळणार आहे. या वेळी ख्रिश्चनांचा जोर आहे. त्यांना भारताकडूनच मदत मिळते. आता भारत उपाशीपोटी मरत आहे तर परतफेड होत आहे. इथूनच अमाप धन, हिरे-माणके इत्यादी तिकडे घेऊन गेले आहेत. खूप श्रीमंत बनले आहेत तर मग आता पैशाचा पुरवठा करत राहतात. त्यांना परत तर मिळणार नाहीये. तर आता तुम्हा मुलांना काही कोणी ओळखत नाही आहेत. जर ओळखले असते तर येऊन सल्ला घेतला असता. तुम्ही आहात ईश्वरीय संप्रदाय, जे ईश्वराच्या सल्ल्यानुसार चालता. तेच मग ईश्वरीय संप्रदायवाले दैवी संप्रदाय बनतील. नंतर मग क्षत्रिय, वैश्य, शूद्र संप्रदाय बनतील. आता हम सो ब्राह्मण आहोत मग हम सो देवता, हम सो क्षत्रिय... 'हम सो' याचा अर्थ बघा किती सुंदर आहे. हा बाजोलीचा (कोलांटी उड्यांचा) खेळ आहे जो समजणे खूप सोपे आहे. परंतु माया विसरायला लावते आणि दैवी गुणांमधून आसुरी गुणांमध्ये घेऊन येते. अपवित्र बनणे हा आसुरी गुण आहे ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) स्कॉलरशिप घेण्यासाठी गृहस्थ व्यवहारामध्ये राहून कमीत-कमी ८ तास बाबांची आठवण करण्याचा अभ्यास करायचा आहे. आठवणीच्या अभ्यासानेच पापे नष्ट होतील आणि गोल्डन एजड तख्त मिळेल.
2. २) या दुःखधामापासून बेहदचे वैराग्य करून आपल्या खऱ्या निवासस्थानांची शांतीधाम, सुखधामची आठवण करायची आहे. देह-अभिमानामध्ये येऊन कोणालाही दुःख द्यायचे नाही.

वरदान:- कर्मांचे हिशोब समजून आपली स्थिती अचल बनविणारे सहजयोगी भव

चालता-चालता जर कोणत्या कर्मांचा हिशोब समोर आला तर त्यामुळे मनाला विचलीत होऊ देऊ नका, स्थिती वर-खाली होऊ देऊ नका. चला, आला आहे तर ओळखून त्याला दूरूनच नाहीसा करा. अजूनच योद्धे बनू नका. सर्वशक्तीवान बाबा सोबत आहेत तर माया तुम्हाला विचलीत करू शकत नाही. फक्त निश्चयाच्या फाऊंडेशनला प्रत्यक्षात आणा आणि वेळेवर वापरा तर सहजयोगी बनाल. आता निरंतर योगी बना, युद्ध करणारे योद्धे नको.

बोधवाक्य:- डबल लाईट रहायचे असेल तर आपल्या सर्व जबाबदाऱ्यांचे ओझे बाबांच्या हवाली करा.

||| ओम शांती |||